-:प्रेसनोट:-

## तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, ब्रम्हपुरी येथील तालुका समुह संघटक, यांचे विरुध्द ॲन्टी करप्शन ब्युरो चंद्रपूरची कारवाई

तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, ब्रम्हपुरी येथील तालुका समुह संघटक श्री. सुदेश ज्ञानेश्वर महाडोळे यांनी मानधना व्यतीरीक्त ईतर केलेल्या सर्व कामांचे बिल काढुन दिल्याच्या मोबदला म्हणुन लाच रक्कम मागणी करून स्विकारल्याने ॲन्टी करप्शन ब्युरो चंद्रपूर यांचे पथकाने आज दि. १०/०६/२०२६ रोजी कार्यवाही केली.

यातील तक्रारदार यांना त्यांचे काम करण्याचा मोबदला म्हणुन शासनाकडुन दरमहा १०,०००/- रु मानधण मिळते. तसेच त्यांचे कार्यक्षेत्रातील माता, बालआरोग्य सेवा व लसीकरन, साथीचे व संसर्गजन्य आजार नियंत्रन, बैठका इत्यादी केलेल्या सर्व कांमांचे बिल तालुका आरोग्य अधिकारी, कार्यालय ब्रम्हपूरी यांचे कडून मंजुर होउन त्यांचे पोस्टाचे खात्यामध्ये दिनांक ०९/०५/२०२६ रोजी ३३,६३१/- रूपये जमा झाले. ईलोसे श्री. सुदेश महाडोळे यांनी प्रोत्साहन भत्ता बिलाची अंतीम तपासनी करून ते बिल समोर पाठविल्याने बिल मंजुर झाले असे सागून यातील तक्रारदार यांना त्याबदल्यात ५०००/- रूपये लाचेची मागणी केली. परंतु तक्रारदार यांना आरोपी श्री. सुदेश ज्ञानेश्वर महाडोळे, वय ४० वर्ष, व्यवसाय- नोकरी, पद- तालुका समुह संघटक, तालुका आरोग्य अधिकारी, ब्रम्हपुरी, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर (कंत्राटी) यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दि.१०/०६/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय चंद्रपुर येथे प्रत्यक्ष हजर येवुन तक्रार दिली.

तक्रारदार यांचे प्राप्त तक्रारीवरून दि.१०/०६/२०२६ रोजी आरोपी श्री. सुदेश ज्ञानेश्वर महाडोळे, वय ४० वर्ष, व्यवसाय- नोकरी, पद- तालुका समुह संघटक, तालुका आरोग्य अधिकारी, ब्रम्हपुरी, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर (कंत्राटी) यांची पंचासमक्ष पडताळणी व सापळा कारवाई केली असता त्यांनी तक्रारदार यांचे बिल काढुन दिल्याचा मोबदला म्हणून ५०००/- रूपये लाच रक्कमेची मागणी करून स्वत: स्विकारले. श्री. सुदेश ज्ञानेश्वर महाडोळे यांना ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास कार्य सुरू आहे.

सदरची कार्यवाही डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, श्रीमती माधुरी बावीस्कर, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर यांचे मार्गदर्शनात श्री. अनिल जिट्टावार, पोलीस उपअधीक्षक, पोलीस निरीक्षक सचिन धर्मेजवार व सापळा पथक पो.हवा. हिवराज नेवारे, रविकुमार इंगळे, पो.शि. अमोल सिडाम, राकेश जांभुळकर, प्रदिप ताडाम, म.पो.शि. मेघा मोहुर्ले, चापोशि/सतिश सिडाम सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर व चापोशि/संदिप कौरासे, मो.प.वि. चंद्रपूर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ आमचेशी संपर्क साधावा.

## लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर


श्री अनिल जिट्टावार, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :- ९८२३२७०५८१
श्री. सचिन धर्मेजवार, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :- ९६२३०५५६५५

**Toll Free No. 1064** **Phone No. : 07172-250251** **Mob. No. 8379951064**
**Email: acbchandrapur@gmail.com** **Website: www.acbmaharashtra.gov.in**


( अनिल जिट्टावार )
पोलीसउपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर